दि २६ जुलै २०१९

सिन्नर – सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिल्यामुळेच आपण आज देशात सुरक्षित आहोत सिन्नर महाविद्यालयातील उपप्राचार्य आर व्ही पवार यांनी प्रतिपादन केले त्यांनी सिन्नर महविद्यालयात संरक्षण शास्त्र व राष्ट्रीय छात्र सेना आयोजित केलेल्या कारगिल विजय दिनाच्या प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालायाचे मा. प्राचार्य डॉ दिलीप बी. शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा.यु ए पठाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मा.उपप्राचार्य आर व्ही पवार यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि कारगिल युद्ध हे सर्वात उंच प्रदेशात लढलेले युद्ध होते आणि जगात एक नविन इतिहास भारतीय सैनिकांनी घडविला. या युद्धामध्ये भारतीय ५२७ सैनिक शहीद तर १००० ते १५०० सैनिक जखमी झाले कारगील युद्धामध्ये पाकिस्तानचा मुख्ख उद्देश प्रत्यक्ष नियंत्रण रेषेत बदल करून हळूहळू जम्मू काश्मीर मध्ये आपला विस्तार करणे हा होता या युद्धात मिग २७ मिग २९ एम आय १७ बफोर्स तोफाचा उपयोग करण्यात आला.या युद्धात चीनने पाकिस्तान सहकार्य होते भारताला अमेरिका रशिया या महासत्तानी तसे अनेक राष्ट्रांनी पाठिबा दिला. कारण पाकिस्तानने प्रत्यक्ष नियत्रण रेषेचे उल्लघन करू आतरराष्ट्रीय कायद्याचे भंग केला आहे.

या प्रसंगी अध्यक्षीय भाषणात मा. प्राचार्य डॉ दिलीप बी. शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सैन्य दलात अधिकारी होऊन देशाची सेवा करावी. युद्धामध्ये अनेक सैनिक शहीद आणि जखमी होतात अशा वेळी जवानांना रक्ताची अत्यंत आवश्यकता असते तर विद्यार्थ्यांनी स्वतःहून सहभाग घेऊन रक्तदान केले पाहिजेत यातून देखील आपली देशभक्ती देशप्रेम प्रकट होते. प्रथम आपल्या मनाची, कुटुंबाची, गावाची, तालुक्याची, जिल्ह्याची, राज्याची, देशाची स्वच्छता करणे यातूनही देशाच्या विकासाला हातभार लागतो आणि त्यामुळे सर्व देशातील लोकांचे आरोग्य चांगले राहुन देशाला शारीरिक दृष्ट्या सक्षम युवक सेनेला मिळेल. कारगील युद्धात देशाचे संरक्षण करतांना आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या शहीदांना कारगील विजय दिना निमित्त विद्यार्थी प्राध्यापक शिक्षेकत्तर कर्मचारी यांनी मानवंदना दिली.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयील प्रा यु ए पठाडे, प्रा.डी के खुर्चे, एन एस एस विद्यार्थी आणि विद्यार्थिनी , एफ वाय व एस वाय बी ए विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. दिपक खुर्चे यांनी मानले.